पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ०५
सभावृत्तांत

दिनांक - ०५/०१/२०२१ वेळ - दुपारी २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक ०५/०१/२०२१ रोजी दुपारी २.३०वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती
२.मा.साधना अंकुश मळेकर
३.मा.अनुराधा गणपत गोरखे
४.मा.सुनिता हेमंत तापकीर
५.मा.सोनवणे शारदा हिरेन
६.मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या शिवाय मा.आगळे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.चारठाणकर- उप आयुक्त, मा.इंगळे, मा.पोरेड्डी- कार्य.अभियंता, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) महिला व्यायामशाळा(जीम) हॉल बांधणेबाबत.- मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) अंदाजपत्रकाबाबत.- मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांनी विकसक नियुक्ती करणेबाबत.- मा.सुनिता तापकीर, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.अनुराधा गोरखे अनुमोदक – मा.सुनिता तापकीर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.शहर सुधारणा समिती(कार्यपत्रीका क्रमांक ०५) दिनांक ०५.०१.२०२१ रोजीची पाक्षिक सभा दिनांक १२.०१.२०२१ रोजी दुपारी २.३० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती – मंगळवार वार दि.१२/०१/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे )
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ०५

सभावृत्तांत

( दिनांक ०५/०१/२०२१ ची तहकूब सभा )

दिनांक - १२/०१/२०२१ वेळ - दुपारी २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक ०५/०१/२०२१ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक १२/०१/२०२१ रोजी दुपारी २.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती
२.मा.अनुराधा गणपत गोरखे
३.मा.सुनिता हेमंत तापकीर
४.मा.सोनवणे शारदा हिरेन
५.मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
६.मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.आगळे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पोरेड्डी-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

अ) दिनांक १५/१२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक **०४** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०६ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १२/०१/२०२१
सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.सुनिता तापकीर
संदर्भ – मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा विभागामार्फत, नागरवस्ती विकास योजना विभागांतर्गत मागासवर्गीय कल्याणकारी योजना आणि महिला व बालकल्याण योजनांमधून शहरातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी तसेच आरोग्याच्या दृष्टीकोनातून विविध उपक्रम राबविले जातात. सांगवी भागातील मुली अथवा महिलांना कठीन प्रसंगी स्वसंरक्षणार्थ शारीरिक व्यायाम प्रकार तसेच जागा इत्यादींचे प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. तरी सांगवी भागातील महिला, मुली यांचे आरोग्य उत्तमोत्तम रहावे तसेच स्वसंरक्षणाचे धडे देणेकामी सांगवी जलतरण तलावाशेजारी असणारी मोकळी जागा उपलब्ध करुन देणेस त्याचप्रमाणे सदर जागेवर महिला व्यायामशाळेकरिता (जीम) हॉल बांधण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १२/०१/२०२१

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.सुनिता तापकीर

संदर्भ – मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील खालील विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदरची कामे अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती (नागरी दलीत वस्ती) सुधारणा योजने अंतर्गत करणेत येणार आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (र.रु.) |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.१३, सेक्टर क्र.२२ येथील अंकुश चौक ते आझाद चौक व सभोवतालच्या परिसरातील स्ट्रॉर्म वॉटर लाईन विकसित करणे. | ७०.०० लक्ष |
| २. | प्रभाग क्र.१३, सेक्टर क्र.२२ निगडी येथील बुद्धनगर, मिलिंदनगर व सभोवतालच्या परिसरातील पाथवे, स्ट्रॉर्म वॉटर लाईन व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ३०.०० लक्ष |
| ३. | प्रभाग क्र.१३, सेक्टर क्र.२२ निगडी येथील बुद्धनगर, विलासनगर व सभोवतालच्या परिसरातील गटर, पाथवे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ४०.०० लक्ष |
| ४. | प्रभाग क्र.१३, सेक्टर क्र.२२ येथील झोपडपट्ट्यांमध्ये हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे. | ३५.०० लक्ष |
| ५. | प्रभाग क्र.११ मधील अजंठानगर, दुर्गा नगर व मोरेवस्ती भीमशक्तीनगर येथे गटर, पाथवे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ३०.०० लक्ष |

तरी वरील विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक - ०३

दिनांक – १२/०१/२०२१

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ – मा.सुनिता तापकीर, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील झोपडपट्ट्यांमधील झोपडपट्टी धारकांसाठी घोषित व अघोषित झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणेची अंतिम कार्यवाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत करणे येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील झोपडपट्टी पुनर्वसनाचे बाबतीत म.न.पा.चे झोनिपु विभाग व शहर सुधारणा समिती हे अनभिज्ञ राहतात. झोनिपु हा विभाग केवळ सदस्य अहवाल तयार करणे पुनर्वसन प्रकल्पाचे नकाशे तयार करणे, विकसीत होणा-या प्रकल्पाच्या सिमा निश्चित करणे, पात्र/अपात्र लाभार्थिंच्या याद्या तयार करणे इत्यादी पुरता मर्यादीत राहिला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोणकोणत्या झोपडपट्टीचे पुनर्वसन करणेत येणार आहे, तसेच त्या नागरिकांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था, आरोग्य इ.बाबींची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहर सुधारणा समितीस नसते. पर्यायाने नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत कायम संभ्रम निर्माण होत आहे. शहर सुधारणा समिती ही शहरातील विकासामधील घोषित/अघोषित झोपडपट्टींचे विकास करताना महत्वाचा घटक आहे आणि ह्याच समितीला दुर्लक्षीत/अनभिज्ञ ठेवणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागांतर्गत शहरातील घोषीत व अघोषीत झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे तसेच शहरातील झोपडपट्ट्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत विकसक नियुक्त करुन झोपडपट्टी धारकांसाठी पुनर्वसन योजना राबविणे या विषयीचे कामकाज करण्यात येते. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात शहरातील विविध ठिकाणी महानगरपालिका, शासकीय अथवा खाजगी जागेवर वसलेल्या झोपडपट्ट्या आहेत. त्याच जागेवर पुनर्वसन करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत एकुण ९ विकसकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, त्याची माहिती सोबतच्या तक्त्यामध्ये जोडली आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घोषित/अघोषित झोपडपट्ट्यामधील झोपडी धारकांचे पुनर्वसन करताना आजवरचे माहितीतील ९ पुनर्वसनाचे प्रस्तावासह यापुढे होऊ घातलेल्या प्रस्तावांची माहिती शहर सुधारणा समितीच्या पुर्व मान्यतेनेच कार्यवाही करावी. तसेच विकासकांचे नियुक्तीबाबत शहर सुधारणा समितीने मान्यता दिल्या शिवाय नियुक्त्या करणेत येऊ नयेत. याशिवाय उपरोक्त परिच्छेद क्रमांक-१ येथे नमुद केलेली झोपडपट्टी पुनर्वसन विषयक इतर (सदृष्य अहवाल, लाभार्थ्यांची मागणी, नकाशे, शुल्क आकारणी इ.) अनुषंगीक कामे देखील मा.शहर सुधारणा समिती यांचे मान्यतेने यापुढे करण्याची विभागाने दक्षता घेणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६/२०२१
दिनांक : १४/०१/२०२१

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## विषय क्र.०३ शी सलंग्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांच्या मार्फत होणाऱ्या झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाचा आज अखेर पर्यंतचा तपशिल

| अ. क्र. | झोपडपट्टीचे नाव व पत्ता | विकसकाचे नाव | एकुण झोपडीधारकांची संख्या | पत्रव्यवहार केलेबाबत तारीख | सद्यस्थिती | संबंधित लिपिक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | म्हातोवानगर, वाकडरोड पुणे – ५७. | मे.प्रथम ओम सिटीस्केप्स एल.एस.पी. १०९, ब्रम्ह गार्डन, बंड गार्डन रोड, पुणे - ०१. | ४१४ | दि.१९/०८/२०१५ ते दि.०४/०७/२०२० | परिशिष्ट-२ प्रमाणे (पात्र अपात्र लाभार्थी यादी SRA ला पाठविली) एकुण लाभार्थी ४१४ पैकी SRA ला २१२ लाभार्थींची यादी पाठविली. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे २०२ लाभार्थी प्रलंबित. तसेच दि.०४/०७/२०२० च्या पत्रान्वये सुधारीत यादीची मागणी केलेली आहे. सदर यादी उपलब्ध अभिलेखानुसार SRA यांच्या वदलत्या आराखडयाप्रममाणे अद्ययावत करण्याचे कामकाज चालु आहे. | श्री. पाटील डी. आर. |
| २ | गवळीनगर, (गवळीमाथा) भोसरी - टेल्को रोड, पुणे -२६. | मे. गोयलगंगा प्रमोटर्स, San Mahu commercial complex 3rd floor, 5 bund garden road, pune -01. | ६५४ | दि.१५/०३/२०११ ते दि.१९/०७/२०१८ | दि. २१/०६/२०१६ रोजी सदर झोपडपट्टीत सन २००० पुर्वीचे पुरावे जमा करणेकामी जाहिर प्रकटन केले आहे. तसेच SRA यांचे दि.१४/१२/२०१७ संचिका मागणी केली असुन दि. १९/०७/२०१८ रोजीचे पत्र मुळ नस्ती व यादी ताब्यात दिलेल्या आहेत. आजतागायत SRA व विकसक यांच्याकडुन कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही. | श्री. दरेकर बी. डी. |
| ३ | लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी, पुणे -१८. | मे. गोयलगंगा प्रमोटर्स, San Mahu commercial complex 3rd floor, 5 bund garden road, pune -01. | ९१२ | दि.२३/०५/२०१४ ते दि.१०/०९/२०१८ | झोपडी धारकांची मुळ यादी व मुळनस्ती या विभागाकडे उपलब्ध आहे. परंतु विकसक व SRA यांनी मागणी केले नंतर पुर्तता करणेत येईल. | श्री. रजपूत व्हि. पी. |
| ४ | साईबाबानगर / इंदिरानगर, चिंचवड रेल्वे स्टेशन, चिंचवड, पुणे -१९. | मे. गोयलगंगा प्रमोटर्स, San Mahu commercial complex 3rd floor, 5 bund garden road, pune -01. | २९२ | दि.०१/०२/२०१८ ते दि.२२/०५/२०१९ | झोपडी धारकांची मुळ यादी व मुळनस्ती या विभागाकडे उपलब्ध आहे परंतु विकसक व SRA यांनी मागणी केले नंतर पुर्तता करणेत येईल. | श्री. पाटील डी. आर. |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांच्या मार्फत होणाऱ्या झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाचा आज अखेर पर्यंतचा तपशिल

| अ. क्र. | झोपडपट्टीचे नाव व पत्ता | विकसकाचे नाव | एकुण झोपडीधारकांची संख्या | पत्रव्यवहार केलेबाबत तारीख | सद्यस्थिती | संबंधित लिपिक |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | गणेशनगर, पिंपरीगांव, पिंपरी वाघेरे, पुणे -१७. | मे.सम्यंक गृहनिर्माण प्रा.लि. कर्वेरोड, पुणे -०४. | ९४ | दि.२३/०५/२०१४ ते दि.२४/१२/२०१७ | परिशिष्ट-२ प्रमाणे एकुण लाभार्थी ९४ पैकी (पात्र अपात्र ७३ लाभार्थी यादी SRA ला पाठविली आहे.) आवश्यक कागदपत्र सादर न केल्यामुळे २१ लाभार्थी प्रलंबित आहेत. | श्री. कांबळे आर. बी. |
| ६ | विजयनगर, एल्प्रो कंपनीसमोर, चिंचवडगांव, पुणे -३३. | लारेस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. ११७६, दिपारेभ को-ऑप. हौ, सोसा. लि. आउट हाऊस, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे -०५. | २५२ | दि.२४/०५/२०१० ते दि.२७/०२/२०१२ | सन २०११ पासुन झोपडपट्टी धारकांनी SRA प्रकल्प राबविणेबाबत विरोध दर्शविल्याने प्रलंबित.आजतागायत SRA व विकसक यांच्याकडुन कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही. | श्री. पाटील डी. आर. |
| ७ | आंबेडकरनगर, नेहरुनगर, पिंपरी, पुणे -१८. | मे. ओमसाई कन्स्ट्रक्शन, पिंपळे गुरव, पुणे -२७. | ८० | दि.१८/०९/२०१४ ते दि.२३/०६/२०१६ | झोपडी धारकांची मुळ यादी व मुळनस्ती या विभागाकडे उपलब्ध आहे परंतु विकसक व SRA यांनी मागणी केले नंतर पुर्तता करणेत येईल. | श्री. रजपुत व्हि. पी. |
| ८ | हिराबाईलांडगे, कासारवाडी, पुणे -१२. | निरंक | २४७ | दि.०४/०३/२०१७ ते दि.०७/०४/२०१७ | SRA यांच्या मागणीनुसार सदर झोपडपट्टीचा सद्य: स्थितीचा अहवाल दिलेला आहे. तदनंतर SRA व विकसक यांच्याकडुन कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही. | श्री. दरेकर बी. डी. |
| ९ | शरदनगर | रेनवो वाणेर पुणे | २३९ | निरंक | SRA व विकसक यांच्याकडुन कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही. | श्री. ठाकर |

प्रा. सोनाली दत्तात्रय गव्हाणे
सभापती-शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका